## प्रकरण पहिले

## "धर्म-स्मृती-स्वरुप व आवश्यकता"

"श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक् सङ्कल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम् ।।"

[या·स्मृ·1·1·7]

## प्रकरण पहिले

## धर्म-स्मृती-स्वरुप व आवश्यकता

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजाला बुद्दी, अंतःकरण आणि संवेदना यांचा थोर वारसा लाभला आहे. या समाजाचे "स्त्री" हे एक महत्त्वाचे अंग आहे. म्हणून तिच्या जन्म-बालपण-शिक्षण या वयोवस्थांविषयी भारतीय वाङ्मयातील विचार करणे अतिशय महत्त्वाचे ठरते. थेट वैदिक काळापासून या विषयाचा विचार केल्यास स्त्री विषयक जीवनचित्रणाला पार्श्वभूमी लाभण्याची शक्यता आहे.

वैदिक वाङ्मय व इतर वाङ्मयः वैदिक काळ आणि त्यानंतरचा काळ हा स्त्री जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगा होता, हे तत्कालीन ग्रंथावरुन आपल्या लक्षात येते. वैदिक आर्यांच्या देवताविषयक कल्पनांवरुन त्या काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा उच्च होता असे दिसते. कोणत्याही देवाला स्त्री तत्वाशिवाय पूर्णता येत नाही असे आर्यांनी मानले होते. एक "शक्ती" या दृष्टीने तिच्याकडे पाहिले जात होते.

वैदिक वाङ्मयातून अध्ययनाच्या बाबतीत स्त्रिया आणि पुरुष असा भेदभाव केलेला आढळत नाही. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच स्वतंत्र व आध्यात्मिक जीवन असल्याचे दिसते. त्यांच्यावर उपनयन संस्कार केला जात असे, संध्या इ.चा अधिकारही त्यांना असे. हारिताने वर्गीकरण केलेल्या "ब्रह्मवादिनी" व "सद्योवधू" अशा दोन प्रकारच्या स्त्रिया या समाजामध्ये होत्या. त्या अध्ययन व अध्यापनाचे कार्य करीत असत.

अथर्ववेदामध्ये[1] ब्रह्मचर्य व वेदाध्ययन यांच्या सहाय्याने मुलगी अनुरुप पती प्राप्त करुन घेत असल्याचा महत्त्वपूर्ण उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे वैधव्यप्राप्तीनंतर पुनर्विवाहाचा अधिकारदेखील तिला देण्यात आला होता.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

वेदकाळातील हा स्त्रियांचा दर्जा मात्र सूत्रकाळात घसरलेला दिसतो. पुरुषप्रधानते-मुळे स्त्रियांचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व लोप पावले त्यांच्या रक्षणाची भरणपोषणाची जबाबदारी पुरुषांनी आपल्याकडे घेतली.

स्मृती काळाचा विचार करीत असता मनुस्मृतीत "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते...।।" असा अभिमान स्त्रियांच्या बाबतीत प्रगट केलेला असला, तरीही शिक्षणाच्या व विवाहाच्या बाबतीत अनेक बंधने स्त्रीवर लादली गेली होती. त्या काळातील राजकीय व सामाजिक परिवर्तनाचा भाग म्हणून का होईना, स्त्री जीवनाला मागासलेपणा येत गेला हे नाकारता येत नाही.

भारतीय दर्शनाचे श्रौत व स्मार्त असे दोन विभाग पडतात. पैकी स्मार्त दर्शनातील मनुस्मृतीमध्ये स्त्री जीवनाचे चित्रण कसकसे झाले आहे याविषयी पुष्कळ लेखन झाले आहे. त्यावर डॉ.काणे, प्रा.कुरुंदवाडकर, डॉ.आ.ह.साळुंखे यांनी पुष्कळ विचार मांडले आहेत. मनुस्मृती खालोखाल किंबहुना मनुस्मृती इतकीच "याज्ञवल्क्यस्मृति" महत्त्वाची आणि प्रमाण मानण्याची पद्धती आहे. तथापि ती दुर्लक्षितच राहिली आहे. मनुस्मृतीतील व्यक्त झालेल्या विचारांसंबंधी उलट सुलट वादळे उठली. मग याज्ञवल्क्याने मांडलेले विचार हे मनुप्रमाणेच आहेत की त्यापेक्षा काही निराळे आहेत. विशेषतः समाजातील स्त्री या घटकाविषयी याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये कसकसा विचार केला आहे, याविषयी चिकित्सा करण्याची जिज्ञासा संशोधिकेच्या मनात उत्पन्न झाली आहे.

हा विषय चतुर्विध पुरुषार्थापैकी पहिल्या धर्म या विषयात आला आहे. त्या दृष्टीने धर्म म्हणजे काय ते सांगून भारतीय धार्मिक वाङ्मयाचा विशेष करून स्मार्त धर्मवाङ्मयाचा इतिहास ध्यानात घेणे संशोधिकेस गरजेचे वाटते.

**<u>धर्म म्हणजे काय ?</u>**

आजच्या काळात समाजव्यवस्थेसाठी सरकार जसे कायदे करते, तसेच पूर्वीच्या काळात मनु इ.नी मानवाच्या कल्याणासाठी, समाजातील सुस्थिरतेसाठी धर्मशास्त्रांमध्ये नियम केले, त्यांनाच धर्म असे नांव पडले.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत अनेक विद्वानांनी धर्म म्हणजे काय. त्याचे स्वरूप इ.संबंधी आपले विचार मांडले आहेत. काळानुसार "धर्म" या शब्दाच्या

अर्थामध्ये परिवर्तने झालेली दिसून येतात·

महाभारतामध्ये "धारणात् धर्म इति आहुः।"- ज्याने धारणा होते तो धर्म असे म्हटले आहे· अर्थात संपूर्ण परंपरेशी ज्या तत्वांचा वा वागणुकीच्या नियमांच्या योगाने आपला संबंध जडतो किंवा धारणा होते, त्याला धर्म म्हणतात·

पूर्वमीमांसेत धर्म म्हणजे काय ते सांगताना म्हटले आहे की, "स्वतःप्रमाण अशा वेदांतील चोदना म्हणजे विधिवाक्य वा आज्ञा हे धर्मज्ञापक प्रमाण होय· विधिवाक्याने आज्ञापिलेले कर्म धर्म होय· वैशेषिक दर्शनात[2] धर्माचे लक्षण "यतो अभ्युदयनिः श्रेयससिद्धिः स धर्मः" याचा अर्थ असा की ज्यायोगे अभ्युदय व निःश्रेयस यांची प्राप्ती होते, तो धर्म होय· प्रस्तुत ठिकाणी विहित आचरणाने पुण्यरूप अदृष्ट आत्मगुण निर्माण होतो तोच धर्म असा अर्थ अभिप्रेत आहे·

जैमिनीने "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः।"[3] म्हणजे उपदेशाने, आज्ञेने किंवा विधीने ज्ञात होणारा श्रेयस्कर अर्थ म्हणजे धर्म होय, असे म्हटले आहे·

## स्मृती ग्रंथामध्ये धर्माची चर्चा :-

धर्माची लक्षणे व आधार कोणते ते सांगताना मनुस्मृती म्हणते -

"वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम्।
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च।।"[4]

समग्र वेद, वेद जाणणा-या मन्वादिकांनी निर्मिलेल्या स्मृती, वेदवेत्त्यांचे शील व आचार आणि धार्मिक सज्जनांचा आत्मसंतोष हे धर्माचे मूलाधार होत·

## याज्ञवल्क्याचे धर्माविषयी मत :-

याज्ञवल्क्यानेही मनुप्रमाणेच धर्माची मूलस्थाने सांगितली असून त्यात काहींची भर घातली आहे -

"श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः।
सम्यक् सङ्कल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम्।।"[5]

याचा अर्थ असा की, वेद, स्मृतिसूत्रादि धर्मशास्त्रे, शिष्टांचा किंवा सज्जनांचा आचार, ज्याच्याविषयी विकल्प असेल अशा धर्मानुष्ठानात स्वतःला जे प्रिय वाटेल

ते आणि उत्तम संकल्पातून निर्माण झालेला व शास्त्रविरुद्ध नसलेला काम म्हणजे इच्छा, हे धर्माचे पाच मूलाधार होत.

याच्यापुढे याज्ञवल्क्य मानवमात्राचा परमधर्म कोणता हे सांगताना म्हणतो-

"इज्याचारदमाहिंसादानस्वाध्यायकर्मणाम् ।

अयं तु परमो धर्मो यद्योगेनात्मदर्शनम् ।।"[6]

होमहवन, मनुष्याच्या उत्कर्षार्थ शास्त्राने सांगितलेला आचार, मनाचे किंवा बाह्य इंद्रियाचे दमन, प्राण्यांस पीडा न देणे, आपली वस्तू नेहमी दुस-यास अर्पण करणे, वेद व शास्त्रे यांचे अध्ययन व काम्य कर्मे वर्ज्य करून इतर सर्व शास्त्रोक्त कर्माचे अनुष्ठान या सर्वात चित्ताची एकाग्रता करून आत्म्याचे साक्षात् दर्शन करणे म्हणजे त्याचा अनुभव घेणे हाच सर्वोत्तम धर्म होय.

वरील सर्व व्याख्यांवरून धर्म आणि अधर्म यातील फरक स्पष्ट होतो. धर्माची संपूर्ण कल्पना व उद्देश नजरेसमोर येतो. एकंदरीत या व्याख्यांवरून असे लक्षात येते की, "स्थलकालस्थितीसापेक्ष तारतम्याने विवेकाचे आचरण म्हणजे धर्म होय." धर्म कल्पनेमध्ये मानवाचे सर्वांगीण कल्याण व उन्नती अभिप्रेत आहे. धर्म ही सतत बदलणारी क्रिया आहे.

## स्मृती वाङ्मयाची परंपरा :-

भारताच्या धार्मिक साहित्यात स्मृतिग्रंथांना महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. धार्मिक बाबतीत श्रुतीच्या खालोखाल स्मृतींना प्रामाण्य वाटते. धर्माचा मूल स्रोत ज्यातून प्रवाहित झाला आहे, त्यात श्रुतीनंतर स्मृती मुख्य आहेत. वेद, वेदज्ञांची स्मृती म्हणजे परंपरा आणि त्यांचा सदाचार ही धर्माची मूळे आहेत असे गौतम धर्मसूत्रात[7] सांगितले आहे. पण श्रुतीत धर्मशास्त्राच्या नियमांचा उल्लेख आनुषंगिक रूपाने येतो. निरनिराळ्या संहितात विवाह, त्याचे प्रकार, पुत्रांचे विविध भेद, दत्तक पुत्राचे विधान, धनविभाग , दायभाग, श्राद्ध, स्त्रीधन इ. विषयांवरील महत्त्वाचे सिद्धांत आलेले आहेत. पण ही माहिती निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेली आढळते. ती सर्व स्मृतिग्रंथात एकत्रित व व्यवस्थितपणे मांडलेली सापडते. स्मृतिग्रंथ हे धर्मशास्त्रविषयक सिद्धांतांचे अतिशय मोठे असे भांडार आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्राचीन काळी स्मृतींची संख्या लहान होती· याज्ञवल्क्याने प्रथम स्मृतींची एकत्र नामावली दिली आहे, तिच्यामध्ये त्याने वीस स्मृतींची नांवे दिली आहेत· त्यानंतरच्या ग्रंथकारांनी दिलेली स्मृतींची संख्या वाढत गेली आहे· अंगिरसाने उपस्मृतींची यादी दिली आहे· नंतरच्या काळातील निर्णय सिंधुकार कमलाकर भट्ट, नीलकण्ठ, वीरमित्रोदय इत्यादी सर्व निबंधकारांनी दिलेली नावे सुमारे शंभर असल्याचे दिसून येते·

या स्मृती निरनिराळ्या काळात रचल्या गेल्या आहेत· अनेक शतकांपर्यंत त्यांची रचना• होत राहिली होती· काही स्मृती जवळजवळ गद्यातच आहेत· गौतम, आपस्तंब, बौधायन, मनू यांच्या स्मृती इसवीसनापूर्वी लिहिल्या गेल्या आहेत· तर याज्ञवल्क्य, पराशर व नारद यांच्या स्मृतींचा रचना काळ इ·स·पहिले, दुसरे शतक असा आहे· याशिवाय बाकीच्या बहुतेक स्मृती इ·स·400 ते 1000 या काळात रचलेल्या आहेत·

शाततप, हारित व अत्री या नावाच्या दोन किंवा तीन निरनिराळ्या स्मृती आहेत· उदाहरणार्थ याज्ञवल्क्यस्मृती व वृद्धयाज्ञवल्क्यस्मृती; गार्ग्यस्मृती व वृद्धगार्ग्यस्मृती; वृद्धमनुस्मृती व वृद्धवसिष्ठस्मृती. वृद्ध व बृहत् हे उपपद जोडलेल्या स्मृती विस्तृत असून, नंतरच्या काळात रचलेल्या आहेत·

सर्व स्मृती सारख्याच प्रमाणभूत मानल्या जात नाहीत· काही स्मृती तर सध्या उपलब्धदेखील नाहीत· स्मृतींवरील भाष्यांच्या संख्येवरुन तिचे प्रामाण्य ठरवावे ही कसोटी लावायची झाल्यास मनुस्मृती हीच सर्वश्रेष्ठ व सर्वाधिक प्रमाणभूत मानली जाते· तिच्या खालोखाल याज्ञवल्क्यस्मृतीचा दर्जा महत्त्वाचा आहे· त्यानंतर इतर स्मृतींचा क्रमांक लागतो·

धर्मशास्त्राप्रमाणेच सामाजिक दृष्टीने देखील स्मृतींना अतिशय महत्त्व आहे· भारतीय समाजाची रचना चातुर्वर्ण्य आणि चार आश्रम यांच्या सिद्धांतावर आधारित आहे· चार वर्ण आणि चार आश्रम यांची माहिती आपल्या धर्मशास्त्राच्या ग्रंथांवरुनच कळते· हिंदूच्या उपनयन, विवाह इ·सोळा संस्कारांचे वर्णन स्मृतिग्रंथात आढळते· एकंदरीत भारतीय समाजाची परिस्थिती जाणून घ्यायची असेल, तर त्यासाठी स्मृतींचे अध्ययन आवश्यक ठरते·

भारतीय व्यवहाराचे अर्थात कायद्याचे ज्ञान करून घ्यायचे असल्यास देखील स्मृतींचा अभ्यास आवश्यक आहे· मनु, याज्ञवल्क्य, नारद इत्यादींच्या स्मृतीत, भारतीय व्यवहारशास्त्राचे विस्तृत व पाण्डित्यपूर्ण केलेले विवेचन आश्चर्यकारक आहे· इंग्रजांच्या राजवटीत आणि सध्याच्या न्यायालयात दायभागाचे जे नियम केले आहेत, ते प्राचीन धर्मशास्त्राच्या आधारे केलेले आहेत· बंगालमध्ये दायभागासंबंधी जो कायदा लागू आहे तो जीमूतवाहनाच्या ग्रंथावर आधारीत आहे आणि इतर राज्यांत या संबंधीचे कायदे याज्ञवल्क्य स्मृतीच्या मिताक्षरा या टीकेवरून घेतलेले आहेत· याप्रमाणे धार्मिक, सामाजिक व कायद्याच्या दृष्टीने या स्मृती अत्यंत महत्त्वाच्या आहेत·

स्मृतींमध्ये प्रामुख्याने आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या तीन बाबींचे वर्णन आलेले आहे· आचार विषयाच्या अंतर्गत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण आणि ब्रह्मचर्य, गार्हस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम यांची कर्तव्ये सांगितलेली आहेत· संस्कारांच्या द्वारा सुसंस्कृत झालेली व्यक्तीच स्वतःचे व पर्यायाने समाजाचे कल्याण करू शकते, याची जाणीव असल्यामुळे प्राचीन ऋषींनी काही संस्कार निर्माण केले· त्या संस्कारांचे विस्तृत विवेचन आपल्याला स्मृतींच्या आचार विभागात पाहावयास मिळते· शिष्याची राहणी, त्याची दिनचर्या, त्याचे अध्ययनाचे विषय, आचार्याशी त्याची वागणूक, अनध्याय इ· शिष्यांशी संबंधित असलेल्या सर्व विषयांचे वर्णन स्मृतीत केले आहे· त्यानंतर गृहस्थधर्म, त्याची कर्तव्ये, अन्य आश्रमातील व्यक्तींशी त्याचा व्यवहार, गृहस्थाश्रमाची श्रेष्ठता, वानप्रस्थाश्रमी व्यक्तीचे जीवन, त्याची कर्तव्ये, ख-या संन्याशाचे लक्षण, त्याचा धर्म, त्याचा दैनिक आचार, त्याची वृत्ती इ·अनेक विषयांचे विवेचन स्मृतीत आले आहे·

त्याचबरोबर राजनीतीचे वर्णनही यात विस्ताराने केलेले दिसते· राजाची दिनचर्या, त्याची कर्तव्ये, प्रजेशी त्याची वागणूक, समाजात दंडविधानाची असलेली आवश्यकता, राजाने करायचे त्याचे पालन इ·विषयांचे विवेचन स्मृतिकारांनी केले आहे· तसेच वैश्य व शूद्र वर्णांचेही विस्ताराने वर्णन केले आहे·

आज ज्याला आपण फौजदारी व दिवाणी कायदे म्हणून ओळखतो· त्या सर्वांचे स्मृतीमध्ये "व्यवहार" अंतर्गत स्पष्टीकरण दिले आहे· फौजदारी कायद्याच्या कक्षेत दंड, दंडाचे प्रकार, साक्षीदाराचे प्रकार, शपथ, अग्निशुद्धी, अर्जीदावा, न्यायाधीशाचे गुण, निर्णय देण्याची रीत इ·विषय येतात· फौजदारी कचेरीतल्या गोष्टींचे जिवंत

वर्णन आपल्याला स्मृतीत वाचावयास मिळते· याशिवाय सीमेचा निर्णय, संपत्तीची वाटणी, दायभागाचे अधिकारी, करव्यवस्था, दिवाणी कायदे इ·संबंधीचे वर्णन स्मृतीमध्ये केलेले आढळते·

प्रायश्चित्त प्रकरणामध्ये धार्मिक व सामाजिक कृत्ये न केल्याने किंवा चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे जी पापे उत्पन्न होतात, त्यांच्या निवारणासाठी निरनिराळ्या प्रकारची प्रायश्चित्तेही सांगितली आहेत·

भारतीय समाजाची नीट व्यवस्था लावणे हे स्मृतिकारांचे मुख्य कार्य होते· समाजाचा उत्कर्ष झाला की व्यक्तीचा उत्कर्ष होतो, म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या उत्कर्षाची इच्छा बाळगणा-या स्मृतिकारांना अनेक व्यापक नियम केले· त्यामुळे निरनिराळ्या विदेशी आक्रमणांच्या काळातही भारतीय समाज टिकाव धरू शकला· अशा पद्धतीने वैदिक संस्कृती व भारतीय समाज यांना प्रतिष्ठित करण्याचे प्रशंसनीय कार्य स्मृतिकारांनी केले आहे·

स्मृतिग्रंथामध्ये सर्वाधिक प्रामाण्य असणारा ग्रंथ हा मनुस्मृती· त्या खालोखाल किंबहुना बरोबरीचा असलेला ग्रंथ म्हणजे "याज्ञवल्क्यस्मृति·" या स्मृतीग्रंथाविषयी सांगण्यापूर्वी त्याच्या कर्त्याविषयीचे जीवन इ·विषयक पाहणे आवश्यक ठरते·

**याज्ञवल्क्याचे जीवनचरित्र-कालखंड-ग्रंथसंपदा :-**

याज्ञवल्क्य हा वेदशाखेचा प्रवर्तक व तत्वज्ञानी आचार्य होता· हा ब्रह्मराताचा पुत्र होता व वैशंपायन महर्षीचा भाचा व शिष्य होता· मिथिला नगरीमध्ये तो राहत असे· हा उद्दालकाचा शिष्य असून, आसुरी हा याचा शिष्य होता, असेही म्हटले आहे· मैत्रेयी व कात्यायनी हा दोन पत्नी त्याला होत्या, कात्यायन व पिप्पलाद हे त्याचे पुत्र·

याज्ञवल्क्याने वाजसनेयी या वेदशाखेचे प्रवर्तन केले· वैशंपायनाजवळ सत्तावीस वेदशाखांचे अध्ययनही त्याने केले होते· वैशंपायनाच्या उक्तीने क्रोधाविष्ट होऊन त्याने दिलेला वेद वमन करून नवा वेद प्राप्त केला· या त्याच्या वेदनिर्मिती संदर्भात दोन कथा आढळतात·

राजा जनकाच्या अश्वमेधप्रसंगी याज्ञवल्क्याने अश्वल, उषस्त, कहोड इ·विद्वान ऋषींमध्ये आपल्या ज्ञानाने वर्चस्व सिद्ध केले, गार्गी या पंडितेशी देखील त्याने वादात्मक

चर्चा केली, शाकल्याला निरुत्तर केले· याप्रमाणे विद्या व तत्वज्ञानाच्या तेजामुळे जनकाच्या सभेत त्याने वैभव जिंकले·

सूर्याराधना करून मिळविलेल्या मंत्राच्या सहाय्याने नव्या यजुर्वेदाच्या 15 शाखा निर्माण केल्या, यांची ब्राह्मणेही त्याने निर्माण केली· आपल्या वेदाला त्याने शुक्ल यजुर्वेद असे नांव दिले· अल्पावधीत त्याने संपूर्ण उत्तर भारतात आपल्या वेदाला प्रतिष्ठा मिळवून दिली·

संन्यासप्रसंगी याज्ञवल्क्याने त्यांच्या इच्छेनुसार कात्यायनीला सर्व संपत्ती व मैत्रेयीला आत्मज्ञान देऊ केले·

बृहदारण्यक उपनिषदावरून त्याच्या प्रगाढ तत्वज्ञानाचा बोध होतो· जनकाच्या सभेतील त्याचे तत्वज्ञानाविषयक मुख्य मुद्दे असे - ·1·ज्याप्रमाणे सर्व विचार मनात सामावतात, त्याप्रमाणे सर्व वस्तू आत्म्यात केंद्रित होतात, ·2·आत्मा सर्व व्यापी आहे, ·3·आत्म्यासाठीच जगातील सर्व वस्तू प्रिय आहेत· आपण जेव्हा एखाद्यावर प्रेम करतो, तेव्हा आत्माच आत्म्यावर प्रेम करीत असतो· आत्मप्राप्ती हेच सर्व प्रयत्नांचे ध्येय आहे, ·4·आत्माच तेवढा सत्य, बाकीचे सर्व दिखाऊ होय·

याज्ञवल्क्य हा प्रगाढ पंडित, तत्ववेत्ता, निर्भीड, स्वाभिमानी आणि पराकाष्ठेचा प्रयत्नवादी होता·

याज्ञवल्क्याने आपल्या उत्तर आयुष्यात अनेक ग्रंथ रचले· त्यातील मुख्य चार ग्रंथ असे-

1· **याज्ञवल्क्यशिक्षा**:- यामध्ये माध्यंदिन व वाजसनेय यांनी स्वतःच्या वेदाचे अध्ययन व अध्यापन कसे करावे याचे निरूपण आहे·

2· **प्रतिज्ञासूत्र** :- यात मंत्रांचे स्वर कसे जाणावे याची माहिती दिली आहे·

3· **शतपथब्राह्मण** :- यात शुक्ल यजुर्वेदाच्या 15 शाखंची विभागचिकित्सा केली आहे·

4· **याज्ञवल्क्यस्मृती** :- धर्मशास्त्रविषयक बाबींचे विवेचन करणारा ग्रंथ· याची सविस्तर माहिती पुढील मुद्द्यात केलेली आहे·

या व्यतिरिक्त याज्ञवल्क्याने योगशास्त्र रचले असल्याचा उल्लेख आढळतो·
{या·स्मृ·3·4·110}

याज्ञवल्क्यस्मृती या ग्रंथाच्या प्रायश्चित्त अध्यायातील "ज्ञेयं चारण्यकमहं··· ज्ञेयं योगमभीप्सता" या श्लोकावरून आदित्यापासून बृहदारण्यक प्राप्त करून घेणारा याज्ञवल्क्यच याज्ञवल्क्यस्मृतीचा कर्ता असल्याचे लक्षात येते· या स्मृतीचे प्रसिद्ध टीकाकार श्री·विज्ञानेश्वर यांनी आपल्या "मिताक्षरा" नावाच्या टीकेच्या प्रस्तावनेत म्हटले आहे- योगीश्वर याज्ञवल्क्य हे धर्मशास्त्रप्रवर्तक असून त्यांना सामश्रव इ·शिष्यांना उपदेश केलेल्या धर्मातच याज्ञवल्क्यस्मृती या ग्रंथात त्यांच्या शिष्याने संग्रह केला आहे· म्हणून या शास्त्राला "याज्ञवल्क्यस्मृति" असे नांव दिले आहे·

या स्मृतीचा काळ म·म·डॉ·काणे यांनी इ·स·100 ते 300 असा मानला आहे·

याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये हिंदू माणसाच्या धार्मिक जीवनाशी निगडीत असलेल्या अनेक विषयांची चर्चा केलेली आढळते· विविध वर्णाश्रमातील लोकांची भिन्नभिन्न कर्तव्ये सांगितलेली दिसतात· या ग्रंथांची विभागणी आचार, व्यवहार, व प्रायश्चित्त अशा तीन अध्यायात केलेली आढळते· या ग्रंथामध्ये आलेले विचार पुढीलप्रमाणे -

प्रथम आचाराध्यायामध्ये धर्मलक्षण, ब्रह्मचारी धर्म, विवाह, वर्णजातिविवेक, गृहस्थ-धर्म, स्नातकव्रते, भक्ष्याभक्ष्यविचार, द्रव्यशुद्धी, दान, श्राद्ध, गणपतिकल्प, ग्रहशान्ती, राजधर्म इ·विषयांचा प्रामुख्याने अंतर्भाव आहे·

द्वितीय व्यवहाराध्यायामध्ये व्यवहार म्हणजे न्यायप्रविष्ट वादाचे लक्षण· व्यवहारसभेचे सभासद व न्यायाधीश, अभियोग, प्रत्यभियोग, प्रतिभू, दण्डप्रकार, ऋणादान, उपनिधी, साक्षी, लेख्य, दिव्य, दायभाग, दत्तकपुत्र, स्त्रीधन, क्षेत्रसीमा-विवाद, स्वामिपालविवाद, दत्ताप्रदानिक, वेतन, द्यूत, वाक्पारुष्य, दण्डपारुष्य, साहस, स्तेय, स्त्रीसंग्रह, कूट, इ· न्यायालयीन विषयांची चर्चा केलेली आहे·

तिस-या प्रायश्चित्त अध्यायात अशौच प्रकरण, आपद्धर्म, वानप्रस्थधर्म, यतिधर्म, कर्मविपाक, विविध पातकांची प्रायश्चित्ते, चांद्रायणादि विषयांचे संक्षेपाने विवेचन केलेले आढळते·

मनुस्मृतीमध्ये आलेले विषय याज्ञवल्क्याने पुनरुक्ती टाळून संक्षेपाने परंतु अधिक सुसंगत रीतीने मांडले आहेत· मनुस्मृतीचा विस्तार 2,684 इतक्या श्लोकांचा

आहे· मनूच्या विषयांचा संक्षेप करून याज्ञवल्क्याचे 1,003 इतके श्लोक झाले आहेत· मनुस्मृतीत आढळणारे काही विषय याज्ञवल्क्याने गाळले आहेत, तर काही विषयांची भर घातलेली आहे·

याज्ञवल्क्य स्मृतीत अंतर्भूत गणपतिकल्प, ग्रहशांती हे विषय या स्मृतीने गणपतिकल्पाचा विषय मानवगृह्यसूत्रावरून घेतलेला दिसतो·

याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये तुला, अग्नी, जल, विष आणि कोश ही पाच दिव्ये व्यवहाराध्यायात • सविस्तर वर्णन केली आहेत· मनुस्मृतीत मात्र काही दिव्यांचा ओझरता संदर्भ आढळतो·

याज्ञवल्क्यस्मृतीच्या प्रायश्चित्त अध्यायामध्ये वर्णन केलेले गर्भातील अर्भकाच्या अवस्था· शरीराचे भेद व अवस्था हे विषय मनुस्मृतीत आढळत नाहीत· मात्र मनुस्मृतीमध्ये आलेल्या विश्वाच्या उत्पत्ती रहस्याचे विवेचन याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये आढळत नाही·

याज्ञवल्क्य स्मृतिकारांनी त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या धर्मशास्त्रविषयक वाङ्मयाचा व्यासंग केला असला पाहिजे· याज्ञवल्क्यस्मृतीचे कर्ते शुक्ल यजुर्वेद संहिता व पारस्कर गृह्यसूत्र या ग्रंथाचे विशेष अभ्यासक असणे स्वाभाविकच आहे, ही वस्तुस्थिती डॉ·काणे व डॉ·स्टेन्झलर यांनी अंतर्गत पुराव्यानिशी स्पष्ट केली आहे·

याज्ञवल्क्यस्मृतीत याज्ञवल्क्याच्या बरोबरच मनू, अत्री, विष्णू, हारित, उशनस्-अंगिरस, यम, आपस्तम्ब, कात्यायन, व्यास, गौतम, शाततप, वसिष्ठ इ·वीस ऋषींचा धर्मशास्त्रांचे प्रवर्तक म्हणून उल्लेख केलेला दिसून येतो· यावरून भारतीय ऋषींनी रचलेली धर्मशास्त्रे याज्ञवल्क्य स्मृतीपुढे असली पाहिजेत· विशेषतः प्राचीन गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, कौटिलयाचे अर्थशास्त्र आणि मनुस्मृती यांचा मागोवा घेत ही स्मृती रचली गेली असावी·

वर्णधर्म, आश्रमधर्म, स्त्रीधर्म, राजधर्म, चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील त्रैवार्णिकांचे विशेषतः ब्राह्मणवर्गाचे विशेष स्थान, अधिकार आणि कर्तव्ये, अनुलोम आणि प्रतिलोम विवाहातून निर्माण झालेल्या अम्बष्ठ, निषाद, पाराशर, सूत, वैदेहक, चाण्डाल, क्षत्ता, अयोगव, रथकार या जाती इ·चे विवेचन तत्कालीन समाजाचे दर्शन घडविते· मानवी मनाचे धर्म, त्यांच्या आशा-आकांक्षा आणि भयस्थाने या गोष्टींचे दर्शन विशेषतः

व्यवहार आणि प्रायश्चित्त या अध्यायातून पाहावयास मिळते.

याज्ञवल्क्य स्मृतीवर विश्वरुप, श्रीकर, विज्ञानेश्वर इ.प्राचीन व अपरार्कादि अर्वाचीन विद्वानांनी टीका लिहिल्या आहेत. तथापि सध्या त्यातील दोन किंवा तीनच प्रसिद्ध आहेत. या सर्व टीकांमध्ये विज्ञानेश्वराने सुमारे 1070 ते 1100 या कालावधीमध्ये लिहिलेल्या "मिताक्षरा" हीच टीका विद्वानाना अधिक संमत आहे.

प्रस्तुतच्या लघुप्रबंधामध्ये याज्ञवल्क्यस्मृती, त्यावरील बालक्रीडा, दीपकलिका, अपरार्कादि टीका इ.टीकांबरोबर विशेषतः मिताक्षरा टीका आणि श्री.विष्णुशास्त्री बापट यांची मिताक्षरासारासह असलेली श्रीयाज्ञवल्क्यस्मृती समोर ठेवून याज्ञवल्क्य स्मृतीतील स्त्री-विषयक विचारांची चिकित्सा केली जाणार आहे. धर्मशास्त्रावरील ग्रंथात देखील मिताक्षरा टीकेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्यापूर्वी दोन हजार वर्षांच्या कालखंडात झालेली धर्मविषयक चर्चा लेखकाने या ग्रंथात एकत्रित केली असून पुढच्या काळातील लेखकांना देखील त्याच्यापासून मोठी प्रेरणा मिळालेली आहे. बंगाल व पंजाबचा अपवाद वगळता भारताच्या सर्व प्रांतातील न्यायालयातून न्याय देताना ही टीका आधार मानली जाते. या टीकेत अनेक स्मृतींची मते चर्चेला घेऊन त्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यवस्थित व अव्यवस्थित विकल्पांचे आणि प्रायश्चित्तांचे विस्तृत विवरण हे देखील या टीकेचे वैशिष्टय आहे..

**धर्म विषयाची गरज :-**

आज आपण समाजातील विविध घडामोडींकडे नजर टाकली तर आपल्याला जिकडेतिकडे अंधाधुंदी, बेबंदशाही, स्वैराचार माजलेला दिसत आहे. बॉम्बस्फोट, मंदिरांची उद्ध्वस्तता, भोसकाभोसकी, जाळपोळ, लुटालूट, बलात्कार यासारख्या घटना रोज ऐकायला, पाहायला मिळत आहेत. या विविध घटनांच्या पार्श्वभूमीवर या सर्वांना पायबंद घालण्यासाठी, समाजामध्ये सुस्थिरता, शांतता निर्माण होण्यासाठी आज संस्कारपूर्ण शिक्षणाची जाणीव व आचरण यांची गरज आहे .

**सारांश :-**

1. भारतीय समाजाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले आहेत. या पुरुषार्थांची प्राप्ती करून घेताना व्यक्तीला स्त्रीचे सहकार्य हवेच असते. तसेच स्त्री ही व्यक्तीच आहे. ती देखील पुरुषांप्रमाणे पुरुषार्थांची प्राप्ती करून

घेऊ शकते. भारतीय समाजाचा स्त्री हा महत्त्वाचा घटक आहे म्हणून धर्मशास्त्रपर वाड्मयात तत्कालीन स्त्री जीवनाचे प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे धर्मशास्त्रपर वाड्मयाचा भाग म्हणून प्रसिद्ध असलेल्या स्मार्त वाड्मयातील याज्ञवल्क्यस्मृतीत प्रतिबिंबित झालेल्या स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास करण्याचे संशोधिकेने ठरविले आहे, असा अभ्यास हल्लीच्या समाजास विशेषतः स्त्रियांना आपल्या प्रगतीच्या दृष्टीने उपयोगी होईल असे संशोधिकेस वाटते.

2. चतुर्विध पुरुषार्थांपैकी "धर्म" हा प्रथम पुरुषार्थ मानला जातो. धर्माबाबत प्राचीन आणि आधुनिक विद्वानांनी पुष्कळ ऊहापोह केला आहे. धर्मामध्ये मानवाचे कल्याण आणि विकास या गोष्टी अभिप्रेत आहेत. धर्म सतत बदलणारी क्रिया आहे. तथापि मला वाटते "धर्म" म्हणजे स्थलकालसापेक्ष तारतम्याने विवेकाचे आचरण."

3. समाजातील उच्छृङ्खल वर्तनाचा बीमोड करून सुस्थिरता प्रस्थापित करण्यासाठी संस्कारयुक्त शिक्षणाची आवश्यकता आहे.

4. भारतीय समाजाचे स्त्री हे एक महत्त्वाचे अंग आहे. धर्माचे मुख्यत्वेकरून आचरण करणारा घटक स्त्री हा आहे. तेव्हा याज्ञवल्क्यस्मृतीमधील स्त्री-जीवनाच्या विविध अवस्था तिचे अधिकार इ. संबंधी चिकित्सा करणे हा संशोधनाचा हेतू आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**संदर्भ :-**

1· अथर्ववेद - 11·5·18

2· वैशेषिक दर्शन - वै·सू·1·1·2

3· जैमिनीय सूत्र - 1·1·2

4· मनुस्मृती - 2·6

5· याज्ञवल्क्यस्मृती - 1·7

6· याज्ञवल्क्यस्मृती 1·8

7· गौतम धर्मसूत्र - 1·1·2

8· याज्ञवल्क्यस्मृती - 3·4·110